|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)

## आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

Department of Lifelong Learning & Extension

जा.क्र. कबचौउमवि/१९/आ.अ.व वि.वि./शे.स.उ.प्रस्ताव/३०/२०२६ ई.पत्र सौर, १४ आषाढ, १९४८ शक संवत

दि.०६/०७/२०२६

**प्रति,**

**१) मा.प्राचार्य/ संचालक / विभाग प्रमुख/समन्वयक**
**कबचौउमविशी संलग्नित सर्व महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्था व**
**विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा/विभाग यानां..**

**विषय :- 'शेतकरी सहायता' उपक्रम राबविणेसाठी प्रस्ताव सादर करणेबाबत..**

**महोदय/महोदया,**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभाग हा विद्यापीठ आणि समाज यातील दुवा म्हणून कार्य करीत असून या विभागाच्या माध्यमातुन विद्यापीठ परीक्षेत्रातील विविध महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने परीसरातील ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य व कायदा तसेच आदिवासी व ग्रामीण भागातील युवक-युवतींसाठी व्यक्तिमत्व विकास, संवाद कौशल्य, उद्योजकता व रोजगार, लिंगभाव व संवेदनशीलता अशा विविध विषयांवरील प्रशिक्षण कार्यक्रम व कार्यशाळा यांचे आयोजन विभागाच्या वतीने वेळोवेळी केले जाते.

याच अनुषगाने मा. कुलगुरु महोदयांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून ' शेतकरी सहायता उपक्रम ' याचा प्रारंभ विभागाने केला आहे. खान्देश ही शेतकऱ्यांची भूमी आहे. खान्देशातील जळगाव, धुळे व नंदुरबार या प्रदेशातील बहुतांश जनजीवन हे शेतीशी निगडित आहे. केळी व कापूस यांच्या उत्पन्नासाठी सुप्रसिध्द अशा या आपल्या भूभागातील सण-उत्सव, यात्रा-जत्रा असे सगळे सांस्कृतिक जीवन शेतीमातीशीच जोडलेले आहे. अशा कृषीसंस्कृतीनिष्ठ प्रदेशातील युवा पिढीच्या उज्ज्वल भवितव्यासाठी विद्यापीठ कटिबंध आहे. या युवा पिढीला उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी कष्ट उपसणाऱ्या त्यांच्या शेतकरी आईवडिलांच्या जीवनविकसनासाठीही विद्यापीठ काही पावले टाकू इच्छिते. त्यासाठी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या माध्यमातून ' शेतकरी सहायता उपक्रम ' आयोजनासाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

' शेतकरी सहायता उपक्रम ' या योजनेच्या माध्यमातून खाली नमूद केलेल्या उपक्रमांच्या धर्तीवर कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठ परिक्षेत्रातील महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांना करता येईल.

१) शेतकऱ्यांसाठी तंत्रज्ञान साक्षरता कार्यशाळा (शेतीशी संबंधित आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग शेतकरी चांगल्या प्रकारे करु शकतील यासाठी प्रशिक्षण)
२) शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन कार्यशाळा
३) शेतीशी निगडीत व शेतीपूरक उद्योग व्यवसायांबाबत मार्गदर्शन व प्रशिक्षण कार्यक्रम (स्टार्टअपसाठी सहाय्य)
४) शेतकऱ्यांसाठी पारंपारिक ज्ञानाचे जतन व हस्तांतरण संवर्धन कार्यशाळा
५) शेतकरी कुटुंबांसाठी समुपदेशन कार्यशाळा

आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व महाविद्यालयांना आणि मान्यताप्राप्त संस्थांना आवाहन करण्यात येते की, शेतकरी सहायता उपक्रम आयोजित करावयाचा असल्यास नियम, अटी व शर्ती पुर्ण करणाऱ्यांनी तसा प्रस्ताव विभागाकडे पाठवावा. प्रस्ताव सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात दिलेल्या ई. पत्यावर सादर करावा. **एका शैक्षणिक वर्षात एका हेड खाली फक्त एकच प्रस्ताव सादर करता येईल. प्रस्ताव विभागाचा ई पत्ता directorllleb@nmu.ac.in वर पाठवावा. कृपया कोणीही हार्ड कॉपी पाठवू नये.**

..२..

यथोचित प्रस्तांवाना मान्यता घेऊन कार्यक्रमाचे आयोजन करण्यास व विद्यापीठ नियमानुसार कार्यक्रम झाल्यानंतर देयके सादर केल्यावर अनुदान महाविद्यालय/संस्था यांच्या बँक खात्यात ऑनलाईन पध्दतीने वर्ग करण्यात येईल.

अधिक माहितीसाठी आजीवन अध्ययन व विस्तार विभाग कबचौउमवि, जळगाव येथे ०२५७-२२५७४१५ व २२५७४१६ वर संपर्क साधावा, ही विनंती.

कळावे!

**आपला विश्वासू**

**(प्रा. डॉ. मनिष र. जोशी)**
**संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग**

**सोबत:- प्रस्ताव पाठविण्याच्या नमुना**

**प्रत:- १) मा. जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव:-** उपरोक्त परिपत्रकास विविध वर्तमानपत्रात बातमीच्या रुपात प्रसिध्दी द्यावी ही विनंती.

**२) पध्दती विश्लेषक, संगणकशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव :-** सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रकट करावे.

---

**Phone-0257-2257415/416** **वेबसाईट-nmu.ac.in**
**FAX-0257-2258403-406** **ई.मेल- directorllleb@nmu.ac.in**

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)



## आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

Department of Lifelong Learning & Extension

## शेतकरी सहायता उपक्रम (२०२६-२७)

---

महाविद्यालय/संस्था/विभागाचे नाव :-

शेतकरी सहायता उपक्रमाचे नाव/विषय :-

उपक्रमाचा वार, दिनांक :-

उपक्रमाची वेळ व ठिकाण :-

उपक्रमाचे स्वरुप (अर्धा दिवस/पूर्ण दिवस) व नियोजन :-

उपक्रमासाठी/व्याख्यान/मार्गदर्शनासाठी उपस्थित राहणाऱ्या वक्त्यांची नावे :-

उपक्रमासाठी उपस्थित राहणाऱ्यांची संख्या :- पुरुष:- महिला :-

उपक्रमासाठी अपेक्षित असलेल्या अनुदानाचे सविस्तर विवरण :-

१) तज्ञ साधन व्यक्ती मानधन :-

२) सहभागी प्रतिनिंधिंना चहा, नाश्ता व भोजन :-

३) बॅनर व प्रमाणपत्र (गरज भासल्यास), फोटो :-

४) सभागृह, विद्युत व्यवस्था, मंडप, खुर्ची, टेबल, लाऊड स्पिकर (फक्त मान्यता प्राप्त संस्थासाठी) :-

५) एकूण खर्च :-

**उपक्रम समन्वयक**
**नाव, संपर्क क्रमांक, ईमेल आयडी व सही**

**प्राचार्य/अध्यक्ष/विभागप्रमुख**
**सही व शिक्का**

**प्रस्ताव पाठविण्याचा पत्ता :-** मा.संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, पोस्ट बॉक्स नं.८० उमवि नगर कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव पिन-४२५००१

**संपर्क क्रमांक :-** ०२५७-२२५७४१५ व २२५७४१६ **ई.मेल-** directorllleb@nmu.ac.in

**सूचना :-** उपरोक्त प्रमाणे सर्व माहिती आपण आपल्या महाविद्यालय/संस्था/विभागाच्या लेटर हेड वर ई.मेल द्वारा पाठवावी तसेच जलद व सुलभ संपर्कासाठी संबंधित महाविद्यालय/ संस्था यानी नियुक्त केलेल्या समन्वयकांचा सक्रीय मोबईल नंबर व ई.मेल आयडी देणे अत्यंत आवश्यक आहे.